शिक्षण विभाग प्राथमिक
पुणे महानगरपालिका
जा.क्र. १२९५/२०२३-२४
दिनांक १५/०६/२०२३

प्रति,
सर्व मुख्याध्यापक,
(सरकारी व खाजगी प्राथमिक / माध्यमिक शाळा,
सर्व माध्यमाच्या व सर्व व्यवस्थापनाच्या शाळा)
पुणे महानगरपालिका क्षेत्र...

विषय : सन २०२३-२०२४ या शैक्षणिक वर्षात शालेय परिवहन समिती स्थापन करून स्कूल बस नियमावली २०११ ची काटेकोर अंमलबजावणी करणे बाबत...

संदर्भ : शालेय विद्यार्थी वाहतूक जिल्हा सुरक्षितता समिती मार्गदर्शक सूचना.

उपरोक्त संदर्भान्वये स्कूल बस नियमावली (स्कूल बस करिता विनियम २०११ नुसार काटेकोर अंमलबजावणी करणेबाबतच्या अनुषंगाने सर्व माध्यमांच्या व व्यवस्थापनाच्या शाळांनी शाळामध्ये शालेय परिवहन समिती स्थापन करून या समितीच्या नियमित दरमहा बैठका होऊन त्याची शालेय स्तरावर नोंद रजिस्टर मध्ये ठेवणे आवश्यक आहे. जिल्हा वाहतूक सुरक्षितता समितीद्वारा विद्यार्थी वाहतूक सुरक्षिततेबाबत पुढील निर्देश देण्यात आलेले आहेत. त्याची तंतोतंत पालन करणेबाबत कार्यवाही करावी.

१. सर्व शाळांनी शालेय परिवहन समितीची स्थापना करणे बंधनकारक असून त्याची नोंद www.schoolbussafetypune.org या संकेतस्थळावर करणे आवश्यक आहे. तसेच वेळोवेळी या संकेतस्थळावर शालेय स्तरावर झालेला बदल अपडेट करणे आवश्यक आहे.

२. सर्व शाळांच्या वाहतूक करणाऱ्या स्कुल बसेसच्या मालक, चालक व सहाय्यक यांची अद्यावत यादी (नाव, पत्ता, मोबा. नं, लायसन्स क्रमांक, बॅच क्रमांक पोलीस स्टे. एनओसी सह) स्कूल बस क्रमांकासह शालेय स्तरावर असणे आवश्यक आहे. सदर माहितीची एक प्रत शालेय परिवहन समिती कडे देण्यात यावी. विद्यार्थी वाहतूक करणारे वाहन आरटीओ नियमांची पुर्तता करत असल्याची खात्री करणे आवश्यक आहे. याची शालेय स्तरावरच दक्षता घेणे आवश्यक आहे.

३. संबंधित शाळेचा दुरध्वनी क्रमांक स्कूल बसच्या मागे ठळकपणे लिहिलेला असावा.

४. शालेय प्रशासनाने त्यांच्या शाळेच्या बसेसमधून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी चढ उतार करण्यासाठी शाळेच्या मैदानात पार्किंग व्यवस्था करावी. रस्त्यावर अडथळा निर्माण करू नये.

५. शाळा व्यवस्थापन आणि बस सेवा देणाऱ्या कंत्राटदारामध्ये आवश्यक सामंजस्य करार करणे आवश्यक आहे. दिनांक १४.९.२०११ चा महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या

निर्णयान्वये शाळा व्यवस्थापन आणि बस सेवा देणा-या कंत्राटदारामध्ये आवश्यक सामंजस्य करार करताना सद्भावना पूर्वक केलेल्या किंवा तसा करण्याचा उद्देश असलेल्या कृत्याबद्दल संबंधित प्राचार्य,शाळा व्यवस्थापनाविरुद्ध कुठलाही खटला/दावा वा इतर कारवाई करता येणार नाही. सर्व शाळांनी सामंजस्य करार करण्यासाठी तात्काळ उपरोक्तनुसार कार्यवाही करावी.

६. विद्यार्थी वाहतूक करणा-या बसमध्ये पुरुष सहवर्ती व विद्यार्थीनी असणा-या बसमध्ये महिला सहवर्ती असणे बंधनकारक आहे.

७. वाहन चालक तसेच पुरुष व महिला सहवर्तीच्या वर्तनाबाबत शाळेने खातरजमा करावी.

वरील निर्देशानुसार सर्व माध्यमांच्या व व्यवस्थापनाच्या शाळांनी सन सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात शालेय परिवहन समितीची स्थापना करणे व या समितीच्या शालेय स्तरावर नियमित बैठका घेऊन नोंदी ठेवणे आवश्यक आहे.

तसेच शाळेमध्ये स्कूल बस नियमावली (स्कूल बस करिता विनियम) २०११ ची काटेकोरपणे अमल बजावणी करणे बाबच्या अनुषंगाने सर्व बाबींची पूर्तता शालेय स्तरावर होणेसाठी दक्षता घ्यावी.

(डॉ मिनाक्षी राऊत)
प्रशासकीय अधिकारी
शिक्षण विभाग प्राथ. पुणे महानगरपालिका

खालील तक्ता अहवाल विभागीय सहाय्यक प्र. अधिकारी/ पर्यवेक्षक शिक्षण विभाग प्राथमिक पुणे मनपा यांचेकडे दिनांक ३० जुन २०२३ पर्यंत जमा करण्यात यावा.

सन २०२३-२४ परिवहन समिती शाळा माहिती अहवाल

शाळेचे नाव/पत्ता संयुक्त स्त्री संस्था शारदा प्राथमिक विद्यालय प्राथमिक व माध्यमिक

| परिवहन समिती आहे /नाही | www.schoolbussafetypune.org या आरटीओ च्या संकेतस्थळावर समितीची नोंदणी केली आहे/नाही | एकूण बसेस संख्या | शाळाप्रमुख नाव | मोबाइल क्रमांक |
| --- | --- | --- | --- | --- |
| आहे. | आहे. | व्हॅन - 2<br>रिक्षा - 1 | सौ सुप्रिया सेनगुप्ता | 9765449027 |

प्रत

मा. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे विभाग

सर्व विभागीय सहाय्यक प्र. अधिकारी/ पर्यवेक्षक शिक्षण विभाग प्राथमिक पुणे मनपा

J. K. Joshi

Sengupta
HEAD MISTRESS
Sanyukta Stree Sanstha's

Scanned with OKEN Scanner